# लाल गहू ऑस्ट्रेलियातील नाही

ऑस्ट्रेलियातून आयात केलेला लाल गहू योग्य नाही हि वर्तमान पत्रात आलेली बातमी चुकीची आहे.

भारताने ऑस्ट्रेलियाकडून फक्त पांढरा गहू आयात केलेला आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमांमधून लाल गव्हाविषयी आलेली बातमी हि ऑस्ट्रेलियन गव्हाविषयी नाही अशी प्रतिक्रिया ॲक्टिंग ऑस्ट्रेलियन हाय कमिशनर श्री. डेव्हिड होली यांनी व्यक्त केली. या संदर्भात भारताचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी ऑस्ट्रेलियन गव्हू लाल गहू नसून तो भारतीय गव्हाप्रमाणेच असल्याचे व्यक्तव्य गेल्या महिन्यात केले होते.

ऑस्ट्रेलियन पांढरा गहू ज्याचा व्यापार पूर्ण जगात होतो तो आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या उच्च प्रतीच्या गुणवत्तेसाठी लोकप्रिय आहे. ज्यांना निकृष्ट प्रतीच्या गव्हाला सामोरे जावे लागत आहे त्यांच्याबद्दल आम्हांला सहानुभूती आहे. परंतु लाल गहू हा ऑस्ट्रेलियन गहू आहे हि चुकीची माहिती प्रसारमाध्यमांनी सुधारावी अशी मी त्यांना विनंती करतो असे श्री. होली यांनी सांगितले

पार्श्वभूमी ः
सन २००१ ते २००२ मध्ये गव्हाची आयात तात्पुरती थांबवण्यात आली होती. भारताने ऑस्ट्रेलियाकडून एप्रिल २००६ ते मार्च २००७ या दरम्यान गहू आयात केला. पुढील काळात ऑस्ट्रेलियात पडलेल्या दुष्काळामुळे भारताने ऑस्ट्रेलियाकडून गहू आयात केला नाही.

भारताला गहू निर्यात करण्यापूर्वी ऑस्ट्रेलियन कॉरंटाईन ॲण्ड इन्स्पेक्शन सर्व्हिस (एक्यूआयएस) गव्हाचे निरीक्षण करते. भारताला गहू निर्यात करण्यापूवी एक्यूआयएसने गव्हाची तपासणी करून तो गहू भारत सरकारने नमूद केलेल्या गुणवत्तेच्या निकषांप्रमाणेच असल्याची खात्री करून घेतली होती.

गहू भारतामध्ये आल्यानंतर भारतीय कृषी मंत्रालय, भारत राज्य व्यापार कंपनी (एसटीसी) आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग त्या गव्हाची तपासणी करतात. जर शासकीय विभागाला गव्हाचा दर्जा असमाधानकारक वाटला तर तो गहू अमान्य केला जातो.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा ः श्री. डेव्हिड इंगहाम काऊंसलर (अग्रीकल्चर) ऑस्ट्रेलियन हाय कमिशन @ ०११ ४१४ ९४३५४